राजस्थान शिक्षण मंडळ, वाशीम द्वारा संचालित

राजस्थान आर्य कला, श्री मिठुलालजी कचोलिया वाणिज्य आणि
श्री स. रा. राठी विज्ञान महाविद्यालय, वाशीम

द्वारा आयोजित

महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषद ३२ वे अधिवेशन

अध्यात्म-विज्ञान

संपादक

प्रा. पुरुषोत्तम वानखडे

H.O.D. Philosophy
Sa. S. Deo College Washim

* संपादक मंडळ *
प्रा. डॉ. एस. पी. जाधव
प्रा. डॉ. आर. पी. इंगळे
प्रा. पी. एल. धनविजय
प्रा. आर. जी. मस्के

ISBN-978-81-925525-5-2

अध्यात्म–विज्ञान

PHILOSOPHY

© **संपादक** : प्रा. पुरुषोत्तम वानखडे

प्रकाशक : सृजन प्रकाशन
सौ. वंदना रा. इंगळे
दत्तनगर, अकोला रोड, वाशीम ४४४ ५०५
Mob. 8793689505, Email : drramingle@gmail.com

मुद्रक : आकृती ऑफसेट प्रिन्टर्स, हैद्राबाद

मुखपृष्ठ : डाहोरे प्रिन्टर्स, वाशीम

प्रथमावृत्ती : ३० नाव्हेंबर २०१५

मुल्य : १५० रु.

अनुक्रमणिका

अ.क्र.	विषय	लेखक	पृष्ठ क्र.
1	'चांगल्या जीवना' विषयी	प्रा. डॉ. ज. रा. दाभोळे	9
2	ऐतिहासिक दृष्टिकोनातून भारतीय तत्त्वज्ञान : एक चिंतन	डॉ. साहेबराव गेणू निगळ	11
3	सार्त्रचा राजकीय प्रवास	डॉ. शर्मिला वीरकर	16
4	वास्तुनिष्ठता, व्यक्तीनिष्ठता आणि मुल्यांकनाची प्रक्रिया	डॉ. सुरेन्द्र गायधने	20
5	बहुसांस्कृतिकवाद – भिखू पारेख	प्रा. सुनिलदत्त एस. गवरे	21
6	तत्त्वज्ञानाकडून विज्ञानाकडे	प्रा. राम घाटे	24
7	सॅम्युअल हंन्टीगटन यांचा संस्कृती संघर्षाचा राजकीय सिध्दांत	डॉ. दिपक बोरगावे	29
8	अस्तित्व आणि सारतत्त्व	डॉ. सुनिल काळमेघ	34
9	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे 'सामाजिक न्यायाचे' तत्त्वज्ञान	प्रा. अमन बगाडे	36
10	धर्म संकल्पना: एक तात्त्विक दृष्टिकोन	डॉ. बाळासाहेब मुळीक	39
11	संत चावरांचे सामाजिक तत्त्वज्ञान	डॉ. वेदप्रकाश ई. डोणगावकर	43
12	आधुनिक कालखंडातील अद्वैत वेदान्ताविषयीची मोक्ष संकल्पना	डॉ. नामा ए. व्ही.	46
13	शिक्षण आणि स्त्री	प्रा.डॉ. सुनंदा रामचंद्र भुसारे	51
14	स्वामी विवेकानंदाचे श्रीमद्भगवद्गीतेविषयी तात्त्विक विचार	प्रा. नारायण शंकर गडदे	53
15	महात्मा गांधीचे सामाजिक तत्त्वज्ञान	प्रा. डॉ. विजय शेंडगे	56
16	राजर्षी शाहू महाराज यांचे शिक्षण विषयक विचार	प्रा. पवार एस. डी.	59
17	प्राचार्य शिवाजीराव भोसले यांच्या मते शिक्षण प्रक्रियेतील दुरीत व समाधान	प्रा. मनोज उत्तमराव पाटील	62
18	कान्टचे निरपेक्ष आदेश–एक चिंतन	प्रा. रामेश्वर रावसाहेब कणसे	65
19	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नैतिक तत्त्वज्ञानाची प्रासंगिकता	प्रा. अजय शिंगाडे	68
20	योग तत्त्वज्ञानाचे मानवी जीवनात स्थान	डॉ. आंबटकर वृशाली ओं.	72
21	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक व राजकीय विचार	डॉ. व्ही.पी. पवार	75
22	ज्योतीबांचे स्त्री शिक्षणाचे कार्य	प्रा.सौ. कुलकर्णी स्वाती नागोराव	79
23	जैन दर्शनातील मोक्षमार्ग	प्रा. भुसारे जी. एन.	81

ISBN-978-81-92-5525-5-2

संत चावरांचे सामाजिक तत्त्वज्ञान

डॉ. वेदप्रकाश ई. डोणगावकर
तत्त्वज्ञान विभाग प्रमुख,
मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय, वाशिम

प्रस्तावना :

प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंतच्या अनेक थोर पुरूषांनी बुद्धी आणि भावनांचा, अध्यात्म आणि व्यवहाराचा सुंदर असा समन्वय साधत मानवी अस्तित्वाला महत्व प्राप्त करून दिले. निश्चित रूपाने त्या सर्वांनी तत्कालीन समाजाची मानसिकता लक्षात घेऊन प्राचिनता व आधुनिकता यांच्यात मेळ घातला. ज्याप्रमाणे विवेकानंदानी वैदिक विचारांचा, आंबेडकरांनी बुद्धांच्या विचारांचा, इकबालांनी पैगंबरांच्या विचाराचा परामर्श घेऊन मानवाला विकासोन्मुख करण्याचा प्रयत्न केला, तसाच प्रयत्न या आधुनिक युगाच्या पूर्वार्धाला भारताच्या भुमीवर काही ईसाई धर्मानुयायानी केला होता. ज्यात सेंट कुरियाकोस एलियास चावरा यांचे नाव प्रमुख आहे.

कुरियाकोस एलियास चावरा यांचा जन्म केरळ राज्यातील कईनाकरय या गावातील कुरियाको आणि मरियम यांच्या घरी १० फेब्रुवारी १८०५ रोजी झाला. वयाच्या दहाव्या वर्षापर्यंतचे शिक्षण त्यांनी कोलारी या गावी केले. त्यानंतर थोमा मालपन यांनी चावराला रोमन कॅथोलिक विद्यालयात पुढील शिक्षणाकरिता आमंत्रित केले. तेथे राहून चावरांनी आध्यात्मिक क्षेत्रात प्रगती साधली आणि जनसामान्यामध्ये धार्मिक भावना जागविण्याचे व्रत हाथी घेतले. थॉमस पालाकल आणि फादर थॉमस पोरूकर यांच्या सोबत राहून चावरांनी येशूच्या विचारांची रूजवन करण्याचे कार्य त्या परिसरात केले होते. या सर्व कार्याने प्रभावित होऊन धर्मोपदेशक अपोस्टोलीक स्टॉबिलीनी यांनी ११ मे १८३१ रोजी भारताच्या भुमीवर पहिल्या धर्मप्रचारक गृहाची (Religious House) उभारणी मन्ननम येथे केली. त्यानंतर समाजातील अनेक लोक त्या धार्मिक गृहाशी जुळले. पण दुर्दैवाने त्या धार्मिक स्थळाचे संस्थापक सदस्य थॉमस पालाकल यांचे १८४१ तर थॉमस पोरूकर यांचे १८४६ मध्ये निधन झाले. परिणामी चावरा यांच्यावर त्या पीठाची जबाबदारी पडली. त्यानी पूढे चालून समाजातील विविध घटकाशी संपर्क स्थापित करण्यासाठी अनेक ठिकाणी मठ व शाखांची स्थापना केली.

त्यांनी आपल्या हयातीत जे काही विचार व कार्य केले आहे ते नालागमांगल (Chronicles), साहित्य क्रीथीकल (Literary work), आध्यात्मिक क्रीथीकल (Spiritual writing) आणि कॅथूकल (Letters) या चार खंडात प्रकाशित आहे. चावरांचे निधन ०३ जानेवारी १८७१ रोजी आजरपणाच्या कारणामुळे झाले. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या स्मरणार्थ विविध स्मृतिचिन्ह निर्माण झाली. विशेष म्हणजे १९८६ साली दुसरे पोप जॉन पॉल यांनी चावरांचा 'Blessed' म्हणून गौरव केला. शिवाय त्यांच्या मानवतावादी कार्याला महत्व देत भारत सरकारने त्यांचे चित्र असलेले पोस्टाचे तिकीटही प्रसिद्ध केले. सर्वात महत्वाचे म्हणजे पोप फ्रांसेस यांनी २३ नोव्हेंबर २०१४ रोजी चावरांना कॅथोलीक सेंट म्हणून घोषित केले.

चावरा हे जरी कॅथोलिक या ख्रिश्चन संप्रदायाशी जुळलेले असले तरीही त्यांचे क़ार्य मात्र सबंध मानवजातीसाठी होते. प्रामुख्याने त्यांनी धर्म, धार्मिक स्थळ, शिक्षण, साहित्य इत्यादीच्या माध्यमातून मानवाला त्याच्या आचार–विचाराच्या पातळीवर उंचावण्याचा यशस्वी प्रयत्न केला. त्यांच्या विविधांगी कार्याचा उल्लेख 'PEARL TRULY INDIAN' या इंग्रजी पुस्तकात व्यवस्थित रित्या झाला आहे. या पुस्तकाच्या आधारे चावरांच्या विचार व कार्याचा परिचय करून घेण्याचा प्रयत्न या ठिकाणी केला आहे.

धार्मिक कार्य :

धर्म हा समाजाचा अविभाज्य अंग आहे. मानवी समाजावर सर्वाधिक प्रभाव पाडणारा महत्वाचा घटक म्हणून धर्माकडे पाहीले जाते. चावरांनी धर्मप्रचारक म्हणून कॅथोलिक संप्रदायाकरिता महत्वाची भूमिका पार पाडली. त्यांनी सायरो मलबार चर्चच्या अंतर्गत विविध मठांची स्थापना करून त्यांच्यात ऐक्य प्रस्थापित केले. त्या मठांशी जुळलेल्या धर्मानुयायींना धार्मिक आचरण करण्यासाठी एक आचार संहिता लिहून काढली. त्या आचार संहितेचा वा धर्म पद्धतीचा धर्मानुयायीना परिचय करून देण्यासाठी त्यांनी 'रविवार' हा दिवस सुनिश्चित केला. कॅथोलिक हा सर्वासाठी असल्याचे सांगुन त्या परिसरातील अनेक जाती–धर्माच्या लोकांना ईसाई धर्मात सामावून घेतले. नव्याने धर्मात आलेल्या लोकांना अन्न–धान्य पुरवूण चावरांनी खऱ्या अर्थाने अन्नदानाचे कार्यही त्याठिकाणी केले.

सहित्य क्षेत्रातील कार्य :

ISBN-978-81-92-5525-5-2

कॅथोलिक संप्रदाय हा सर्व समावेशक आहे. तेव्हा अशा या संप्रदायाचा प्रचार झाला पाहिजे, ही भावना जोपासून चावरांनी या संप्रदायाच्या साहित्याची निर्मिती व प्रचाराची जबाबदारी उचलली. साधारणपणे १८४६ मध्ये चावरांनी मन्नानम या ठिकाणी पहिल्या कॅथोलिक छापखाण्याची उभारणी केली. त्यांनी या छापखाण्याच्या माध्यमातून विविध प्रकारच्या श्रद्धा व प्रार्थना पुस्तकांची व कॅथोलिक शिकवण देणाऱ्या साहित्याचे प्रकाशन केले. खऱ्या अर्थाने चावरांचे हे कार्य केरळ राज्यातील नवतरूण स्त्री–पुरूषांना साहित्य निर्माण करण्यासाठी प्रेरणादायी ठरले.

शिक्षण क्षेत्रातील कार्य :

चावरा ईसाई होते. अर्थात त्यांच्यावर ईसाई धर्माच्या मूळ भाषेचा मोठा प्रभाव पडणे सहाजिक होते. परंतु शिक्षणाच्या संदर्भात त्यांनी हा नियम होऊ शकत नसल्याचे दाखवून दिले. म्हणजेच चावरांनी मलियाळम, तामीळ, संस्कृत, लॅटिन, इटालियन, पोर्तुगीज आणि सायरिक इत्यादी भाषांना महत्व देत त्या अवगत केल्या. विशेष म्हणजे त्यांनी त्या सर्व भाषा सामान्यांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला. त्यातील विशेष भाग म्हणजे त्यांच्या धर्मपीठामध्ये त्यांनी संस्कृत भाषेची शिकवण दिली. या संदर्भात आर. व्यकटरमण म्हणतात, "It was indeed a revolutionary act at the time," (P. 66) निश्चितच चावरांचे हे कार्य केवळ भारतासाठीच नव्हे तर संबंध विश्वाच्या धार्मिक ज्ञानपीठासाठी प्रेरणादायी ठरणार आहे. कारण आज जी धार्मिक शिक्षा केंद्रे विशेषत: वेद पाठशाळा आणि मदरसे यासारख्या बहुतांश ठिकाणी त्या त्या केंद्राच्या मूळ भाषेचाच आधार घेऊन ज्ञान दिले जात आहे. एकंदर चावरांचे ते कार्य धार्मिक शिक्षा क्षेत्रातील संकुचितपणाला छेद देणारे होते. संस्कृत भाषा ही भारतातील पुरातन भाषा आहे. या भाषेत फार मोठे तत्त्वज्ञान दडलेले आहे. शिवाय या भाषेपासून मराठी, हिन्दी, गुजराथी, उर्दू, बंगाली इत्यादी भाषा निर्माण झाल्या आहेत. (इंदिरेस पत्रे, पृ.४८) अर्थात या भाषेचे एक विशेष महत्व आहे. कदाचित ही बाब लक्षात घेऊन चावरांनी संस्कृत भाषेचा स्वीकार केला असावा.

व्यावहारिकदृष्टया विचार केला तर चावरांचे हे कार्य भारताच्या भूतकाळाचा भविष्याशी जोडला जाणारा संबंध आहे. अशा आशयाचे मत माजी राष्ट्रपती आर. व्यकटरमण यांनी व्यक्त केले आहे. कुठलेही शिक्षण घेण्यासाठी आवश्यक त्या साधनांची गरज असते याची जाण चावरांना होती. म्हणूनच त्यांनी त्या शिक्षण संस्थेतील गरीब विद्यार्थ्यांकरिता आवश्यक असणाऱ्या वस्तू पुरविल्या. शिवाय उदरनिर्वाहाच्या प्रश्नामुळे शिक्षणाकडे त्या विद्यार्थ्यांचे दुर्लक्ष होऊ नये म्हणून चावरांनी त्यांना अन्न आणि कपडे ही पुरविले. निश्चितच चावरांचा हा कर्मवाद नंतर शासकीय व खाजगी संस्थांनांच्या कार्यप्रणालीवर प्रभाव टाकणारा ठरला असावा. कारण तत्कालीन परिस्थितीत भारतातील कोणत्याही शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना अशा प्रकारच्या सर्व सोई सवलती मिळाल्या नसाव्यात. चावरांच्या आयुष्यातील शिक्षणासंबंधीचे सर्वात महत्वाचे कार्य म्हणजे त्यांनी १८६८ साली कन्नमवू येथील केरळ चर्चच्या माध्यमातून मुलींसाठी पहिली शाळा आणि वसतिगृह उभारले. निश्चितच चावरांचे हे कार्य महत्वाचे तर आहेच. शिवाय ते भारतीय इतिहासातील विशेष बाब आहे.

स्त्री संदर्भातील कार्य :

तत्कालीन परिस्थितीत स्त्रियांचे जीवन अत्यंत मर्यादित होते. त्या चूल आणि मूल याच्या पलीकडे जाऊन अधिकचा विचार करण्यास प्रयत्नरत नव्हत्या. स्त्रियांचे हे अज्ञान पाहून चावरांनी त्यांना चर्चच्या माध्यमातून त्यांना ज्ञानाच्या क्षेत्रात येण्याचे आवाहन केले. स्त्रियांचा प्रतिसाद लक्षात घेऊन चावरांनी फादर लेवोपोल्ड बॅक्कारो आणि कार्मेलिट मशनेरीयांच्या सहकार्याने कन्नमवू येथे महिलांची धर्मसभा भरवली. त्यातून स्त्रियांच्या विविध समस्या जाणुन चावरांनी त्यांना आवाहन केले की, ''धार्मिक जीवन हे केवळ आत्म्याच्या सेवेकरिता वा उद्धाराकरिताच असते असे नाही. तर ते इतरांना आध्यात्मिक आणि भौतिकविषयामध्ये विकास साधण्यासाठी सहाय्यक ठरणारे सुद्धा असते.'' म्हणजेच चूल आणि मूल याच्यातून बाहेर पडून ज्या स्त्रिया धार्मिक जीवनातच गुरफटून पडल्या होत्या. अशा स्त्रियांना चावरांनी खऱ्या अर्थाने इतरांसाठी प्रेरक ठरण्याचे, विकासाचा मार्ग ठरण्याचे सूचविले. अर्थात स्त्रियांना सामाजिक व व्यावहारिक कार्यात सहभागी होण्याचे आवाहन चावरांनी केले. चावरा मूळचे भारतीय असल्यामुळे त्यांना प्राचीन भारतीय तत्त्वज्ञान (शैव तत्त्वज्ञान) चांगलेच ज्ञात असावयास हवे. त्यानुसार स्त्री ही शक्ती स्वरूप आहे. ती प्रेरक आहे. तेव्हा तिच्यातील शक्ती प्रेरक रूपाने समोर आली पाहिजे ही भावना ठेवूनच कदाचित चावरांनी स्त्रियांसाठी शाळा आणि वसतिगृहाच्या माध्यमातून शिक्षणाचे दालन उभे केले. याशिवाय चावरांनी स्त्रियांना प्रत्यक्ष व्यवहारामध्ये सक्षम करण्यासाठी शिक्षण घेऊन नौकरी करण्याचेही सूचविले किंबहुना त्यांच्यासाठी नौकऱ्या उपलब्ध असल्याचे पटवूनही सांगितले. निश्चित रूपाने केरळ प्रांतातील ज्या महिला आज आपण विविध क्षेत्रात आत्मनिर्भरपणे कार्यरत असल्याचे पहात आहोत त्यांच्या मागे चावरांच्या या प्रयत्नांचा मोठा वाटा आहे.

रोगी व वृद्धांसंदर्भातील कार्य (हॅप्पी डेथ) :

सामान्यपणे आपण पहातो की, रोगी व्यक्ती दवाखान्यात आणि निराधार वृद्ध हा अनाथ आश्रमामध्ये आपले उर्वरित जीवन व्यतीत

ISBN-978-81-92-5525-5-2

करीत असतो. विशेष म्हणजे त्यातील अधिकाधिक लोक दु:ख आणि नैराश्याने आपल्या जीवनाचा शेवट करीत असतात. पण दु:ख व मृत्यू ही अनिवार्य बाब आहे. त्याच्या विषयी विनाकारण चिंता करण्यात काही अर्थ नाही. कदाचित अशी धारणा चावरांची असली पाहीजे. म्हणूनच १८६९ साली त्यांनी 'सेंट जोसेफ यांचा आनंदी मृत्यूचा गट' या नावाने एक चळवळ उभी केली आणि या चळवळीच्या माध्यमातून एका अशा घराची स्थापना केली की, ज्या ठिकाणी दु:ख आणि नैराशाने रोगात खितपत पडलेले लोक व अनाथ वृद्ध भरती करून घेतले जायचे. विशेष म्हणजे त्या सर्व लोकांचे चेहरे मृत्यू समयी सुद्धा आनंदाने प्रफुल्लीत राहतील या संबंधीची काळजी त्या ठिकाणी घेतली जायची. निश्चितच चावरांचे हे कार्य अनोख्या स्वरूपाचे होते. त्यांच्या या कार्यातून आपल्याला त्यांच्या मानवतावादी भूमिकेचे दर्शन होते. चावरांच्या या विशेष कार्याचा उल्लेख 'The Concept of Happy Death' या शब्दात केला तर वावगे ठरणार नाही.

अशा प्रकारे कॅथोलिक संप्रदायामध्ये जन्मलेल्या केरळ प्रांतातील या महान व्यक्तीने धर्म हा समाजाभिमुख असतो. किंबहुना तो समाजाभिमुख असावयास पाहिजे, हे आपल्या विचार व कार्यातून दाखवून दिले. विषेश म्हणजे त्यांनी मध्ययुगीन तत्त्वज्ञानातील प्रामुख्याने नैतिक अंगाची कास धरली. विषेश म्हणजे भारतातील तत्कालीन परिस्थिती लक्षात घेऊन त्या नैतिक अंगाला त्यांनी सामाजिक क्षेत्रात रुजवून तत्त्वज्ञानाच्या व्यवहारिकतेचे वा उपयुक्ततेचे उदाहारण मानव जातीसमोर विशेषत: धार्मिक जगतासमोर ठेवले. खऱ्या अर्थाने त्यांच्या माध्यमातून भारताला एका मानवतावादी धर्म तत्त्वज्ञानाची ओळख झाली. म्हणून खऱ्या अर्थाने सेंट कुरियाकोस एलियास चावरा हे मानवतावादी, सामाजिक तत्त्वज्ञ ठरतात.

संदर्भ ग्रंथ :

1. A Pearl Truly Indian, Fr.Thomas Panthapalkal, Fr. Jemes Pampara, Roma Italy, 2005
2. Medieval Philosophy, Ed. John Marenbon
3. इंदिरेस पत्रे, पंडित जवाहरलाल नेहरु, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे,२००१
4. नया नियम (बायबल), गिडियन्स इंन्टरनेशनल इन इंडिया सिकिंदराबाद

ISBN-978-81-92-5525-5-2